# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०४/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## पो.स्टे. सावनेर हद्दीमधील बाबासाहेब कापूस जीनिंग जवळ सावनेर येथे जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २१/०४/२०२४ चे २०/४५ वा. ते २१/३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील बाबासाहेब कापूस जीनिंग जवळ सावनेर परिसरात क्रिकेट मॅच जुगारावर रेड केली असता यातील **आरोपी नामे— १) भूषण रामेश्वर घोळसे, वय २४ वर्ष रा. शेंदेकर ले आऊट वार्ड क्र. २ सावनेर २) साहिल मनोहरराव लांडगे वय २० वर्ष रा. बाजार चौक सावनेर** यांनी सार्वजनिक ठिकाणी मोबाईल ॲप मध्ये टी ट्वेंटी आयपीएल क्रिकेट सामन्यावर लोकांकडून मोबाईल फोनवरून बोलून पैशाचे बाजी लावून हारजीतचा जुगार खेळताना मिळून आल्याने त्यांच्याकडून १) आय कू कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल किंमती ३००००/—रू. २) एक रीयलमी कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल किंमत अंदाजे २००००/— रुपये ३) एक पांढरा कागद क्रिकेट मॅच जुगाराची आकडे लिहिलेले कागद ४) निळा शाहीची बॉलपेन किंमत ३ रु, नगद २३००/— रू असा एकूण ५२३०३/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार रविंद्र मानकर यांचे नेतृत्वात त्यांचा स्टाफ यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापा** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अप. क्र. १२९/१८ कलम ३७६(२)(एल) भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात दिनांक १८/०६/२०१८ चे पुर्वी यातील **आरोपी नामे— दशरथ तातोबाजी साळवे, वय ५६ वर्ष रा. कोदेगाव त. सावनेर** याने पिडीता ही मतीमंद असल्याचा फायदा घेवुन पिडीतेसोबत जबरी संभोग केला. त्यामुळे पिडीता ही आठ महिण्याची गर्भवती झाली.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि गोपीचंद नेरकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. १० आर.आर. भोसले सो. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २२/०४/२०२४ रोजी मा. डी. जे. १० आर.आर. भोसले सो. यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३७६(२)(जे)(आय) भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व २,००,०००/— रू. दंड. दंड न भरल्यास एक वर्ष सहा महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती गवळी मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन मपोना वर्षा धुमाळ पोस्टे खापा यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर